पोलीस अधीक्षक कार्यालय,वजिराबाद चौक नांदेड

EMAIL ID:- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com


**प्रेसनोट** दिनांक–05.08.2025

# सिटी स्ट्रिट सेफ्टी पथक यांची सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन शांतता भंग करणारे व विना परवाना, विना नंबर वाहण चालविणारे इसमांवर धडक कारवाई..

**मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, यांनी नांदेड शहरातील सार्वजनिक ठिकाणी घडणाऱ्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी स्थापन केलेल्या नांदेड सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत पथकाने **मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्री सुरज गुरव**, अपर पोलीस अधीक्षक नांदेड यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली पथक प्रमुख **सपोनि श्री भागवत नागरगोजे** व चार्ली पोलीस अंमलदार यांनी दिनांक 04 ऑगस्ट 2025 रोजी नांदेड शहरात सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन सार्वजनिक शांततेचा भंग करणारे इसमांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

1) **पोलीस स्टेशन विमानतळ** :– सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील पोउपनि श्री दर्शने व चार्ली क्रमांक एक दोन व तीन मधील पोलीस अंमलदार यांना रबडी पॉईट रोडवर विना वाहन परवाना तसेच भरधाव वेगाने विना नंबरचे मोटार सायकल वाहन चालवताना 10 इसम मिळुन आल्याने त्यांचेवर मोवाका प्रमाणे कारवाई करून 7000/–रू दंड आकारण्यात आला.

2) **पोलीस स्टेशन शिवाजीनगर** :– सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एक व दोन मधील पोलीस अंमलदार यांना ज्योती टॉकीज, अण्णाभाऊ साठे चौक परिसरात 04 इसम हे मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्यांचेवर कलम 110/117 म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

3) **पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण** :– सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक तीन मधील पोलीस अंमलदार यांना वसंतराव नाईक कॉलेज परिसरात 01 इसम हा मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्याचेवर कलम 110/117 म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

4) **पोलीस स्टेशन भाग्यनगर** :– सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एक व तीन मधील पोलीस अंमलदार यांना किनवट वॉईन शॉप,तरोडा नाका परिसरात 03 इसम हे मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्यांचेवर कलम 110/117 म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

5) **पोलीस स्टेशन इतवारा** :– सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक दोन मधील पोलीस अंमलदार यांना केळी मार्केट परिसरात 01 इसम हा मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्याचेवर कलम 110/117 म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

6) **दामिनी पथक** :– दामिनी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना पेट्रोलींग दरम्यान राजर्षी शाहू विदयालय परिसरात 03 इसम हे आरडाओरड करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असताना मिळून आल्याने त्यांचेवर पोस्टे शिवाजीनगर येथे कलम 110/117 म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, यांनी नांदेड शहरात कोणीही सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊ नये तसेच दारू पिणाऱ्यासाठी जागा उपलब्ध करून देवू नये व सार्वजनिक शांततेचा भंग करू नये अन्यथा संबंधीत इसमांवर कडक कारवाई करण्यात येईल असे आवाहन केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड